Indian Streams Research Journal
ISSN No : 2230-7850
Impact Factor : 5.1651 (UIF)
Volume - 13 | Issue - 6 | July - 2023

# जि.प.प्रा.शा.चव्हाणवाडी ता. तुळजापूर येथील ऑनलाईन शिक्षणाचे फायदे व तोटे यांचा चिकीत्सक अभ्यास

सुखदेव विष्णू भालेकर , प्रसन्न विलास साखरे
जि.प.प्रा.शा.चव्हाणवाडी ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद.




### समस्या विधान:-

"जि.प.प्रा.शा.चव्हाणवाडी ता. तुळजापूर येथील आॅनलाईन शिक्षणाचे फायदे व तोटे यांचा चिकीत्सक अभ्यास".

### संशोधनाची उद्दिष्टे:-

1.ऑनलाइन शिक्षण विद्यार्थ्यांना त्यांच्या गतीने आणि आरामात विषय शिकण्यास सक्षम करणे2. पारंपारिक शिक्षणाप्रमाणे, ते विद्यार्थ्यांना त्यांच्या गतीशी जुळवून घेण्यास सांगत नाही, उलट, विद्यार्थ्यांशी जुळवून घेणे.
3.ऑनलाइन शिक्षणाद्वारे शिकण्याची आणि शिकवण्याची गुणवत्ता विकसित करा.
4ऑनलाइन शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांची शिकण्याची शैली किंवा गरजा पूर्ण करा.
5.ऑनलाइन शिक्षणाद्वारे शिक्षण आणि विकासाची कार्यक्षमता आणि परिणामकारकता विकसित करा.
6.ऑनलाइन एज्युकेशनद्वारे शिकण्याच्या प्रक्रियेत शिकणाऱ्यांशी कनेक्ट होण्यासाठी वापरकर्ता प्रवेशयोग्यता आणि वेळेची लवचिकता पुनर्प्राप्त करा.
7.सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी माहिती आणि सेवांमध्ये थेट, सार्वत्रिक प्रवेश प्रदान करा.
8.स्कूल ऑफ एज्युकेशनशी जोडलेल्या व्यक्ती आणि गटांसाठी ऑनलाइन परस्परसंवाद क्षमता सुधारा.
9.स्कूल ऑफ एज्युकेशनच्या सध्याच्या गरजा आणि अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञान, समर्थन साधनांचा विस्तार आणि सुधारणा करा.
10.सध्याच्या सेवा, नवीन सेवांच्या समाधानाच्या स्तरांवर वापरकर्त्यांकडून अभिप्राय मिळवा आणि त्यानुसार बदल करा.
11.ऑनलाइन शिक्षणामध्ये संपूर्ण शिक्षण पद्धतींमध्ये सुरक्षितता जागरुकता वाढवा.

### गृहतिके:-

1. सर्वच मुलाकडे इंटरनेट कनेक्शन असू शकत नाही काही जणांकडे इंटरनेट मिशनचा अभाव असतो.
2.संगणक ,लॅपटॉप,मोबाईल यांचा अभाव असू शकतो.
3. ईसाहित्य हाताळण्याबाबतीत अनभिज्ञ असू शकतात.

### संशोधनाची कार्यवाही:-

ज्या विद्यार्थ्यांनी कधी मोबाईल, कम्प्युटर, लॅपटॉप अशा गोष्टी हाताळला नव्हता ते विद्यार्थी आज घर बसल्या अशा माध्यमांचा वापर करून शिक्षण घेत आहेत. त्यामुळे अलीकडच्या पिढीला अधिक ज्ञान मिळाले त्यासोबत त्यांच्या शिक्षणाचे नुकसान देखील झाले नाही. वेगवेगळ्या माध्यमातून शिक्षण घेत असल्याने विद्यार्थ्यांना त्या माध्यमातून भरपूर माहिती मिळते.ऑनलाईन माहितीचा फायदा म्हणजे एखादी गोष्ट समजली नाही तर ती आपण परत परत पाहून ऐकून समजून घेऊ शकतो.

### ऑनलाईन शिक्षणाचे महत्त्व:-

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु अलीकडच्या काळामध्ये वाढत चाललेली गंभीर परिस्थिती म्हणजेच Corona सारख्या गंभीर महामारी सर्व जग ठप्प झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचे शिक्षण देखील ठप्प झालेले आहे. काही काळ विद्यार्थी घरीच बसून होते.महामारी चा धोका दिवसेंदिवस वाढत चालला होता. विद्यार्थ्यांचे नुकसान होत चालले होते आणि महामारी किती दिवस राहणार याचा कोणालाही कल्पना नव्हती. अशा परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण बंद करुन त्यांची जबाबदारी घेणार कोण? हा प्रश्न संपूर्ण जगापुढे पडला होता.ऑनलाइन शिक्षणाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे विद्यार्थी जगातल्या कोणत्याही कोपऱ्यात घरबसल्या शिक्षण प्राप्त करू शकतो, परंतु आजही आपल्या देशात अनेक विद्यार्थ्यांकडे इंटरनेट नाही तर हा ऑनलाइन शिक्षणाचा तोटा आहे.

परंतु ऑनलाईन शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या सर्व प्रश्न सोडवले म्हणजेच विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन ऑनलाईन शिक्षण प्रणाली अस्तित्वात आणली. त्याप्रमाणे विद्यार्थी शाळेमध्ये जाऊन प्रत्यक्ष स्वरूप आणि त्यांना घेत होते पण ते कोरोनाचे परिस्थितीला शक्य नसल्याने ऑनलाइन शिक्षण प्रणाली मुळे सर्व काही शक्य झाले.विद्यार्थी घरबसल्या मोबाईल, कॉम्प्युटर अशा साधनांचा वापर करून घरबसल्या शिक्षण घेऊ लागले.

### ऑनलाईन शिक्षण म्हणजे नक्की काय?:-

पूर्वीच्या काळामध्ये ऑनलाइन शिक्षण किंवा डिजिटल शिक्षण हे केवळ एक कल्पना च होती. परंतु सध्याच्या काळामध्ये ऑनलाइन शिक्षण हेच सत्यात उतरले आहे. ज्या प्रमाणे विद्यार्थी शाळेमध्ये जाऊन प्रत्यक्ष रूपाने शिक्षकां समोर बसून ब्लॅक बोर्ड वर पुस्तकाच्या माध्यमाने शिक्षण घेत होता तेच शिक्षण आत्ता इंटरनेटच्या माध्यमाने घरबसल्या लॅपटॉप कॉम्प्युटर, मोबाईल यांसारख्या साधनांवर होत आहे यालाच ऑनलाइन शिक्षण किंवा शिक्षण प्रणाली असे म्हटले जाते. कोरोना कालावधीत लॉकडाऊन लागले होते म्हणून सर्व शाळा आणि महाविद्यालय बंद होते या परिस्थितीत विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून ऑनलाईन शिक्षण ची खूप गरज वाढली होती.

### ऑनलाईन शिक्षण घेण्याकरिता तुम्हाला कोणत्या साधनांची गरज भासेल?:-

ऑनलाईन शिक्षण घेण्याकरिता आपल्याला कोणत्याही जास्त साधनांची गरज भासणार नाही. ऑनलाईन शिकण्यासाठी आपल्याला केवळ जलद इंटरनेट कनेक्शन, मोबाईल, लॅपटॉप, टॅब किंवा संगणक इत्यादी साधनांची आवश्यकता भासते. याशिवाय, ऑनलाइन लेक्चर मध्ये स्वतःची प्रेझेंटी लावण्यासाठी किंवा ऑनलाईन लेक्चर चा अनुभव घेण्यासाठी तुम्हाला झूम, गुगल मेट यांसारखे ॲप्स ची गरज लागते.

**ऑनलाईन शिक्षण काळाची गरज :-**आजच्या काळामध्ये ऑनलाईन शिक्षणाला काळाची गरज म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही कारण कोरोना व्हायरस ने संपूर्ण जगाची जीवनशैली बदलून ठेवलेली आहे. जागोजागी लोक डाऊन होऊन संपूर्ण जग तर बंद झाले त्यासोबत शाळा, महाविद्यालय देखील बंद झाली.आशा परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन ऑनलाईन शिक्षण प्रणाली अस्तित्वात आणली. विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम थांबवता येणार आहे व विद्यार्थ्यांचे नुकसान करून चालणार नाही या सर्वांचा विचार करून ऑनलाईन शिक्षण हाच पर्याय सर्वांच्या समोर उरला.कोरोना चा प्रसार जरी वाढला तरी देखील विद्यार्थ्यांच्या शिक्षण थांबवता येणार नाही व त्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये त्यामुळे ऑनलाईन शिक्षण काळाची गरज होत चालले आहे.

### ऑनलाईन शिक्षणाचे फायदे :-

ऑनलाइन शिक्षणाचे महत्त्व फायदे आहेत ते पुढील प्रमाणे

1. देशभरात पसरलेल्या कोरोनाच्या संकटामध्ये विद्यार्थ्यांना घराच्या बाहेर न पडता घरबसल्या शिक्षणाचा लाभ घेता येत आहे. या शिक्षणामुळे दूर शाळा असलेल्या विद्यार्थ्यांचा बसा प्रवासाचा खर्च वाचत आहे. याशिवाय विद्यार्थ्याची ऊर्जा आणि वेळ देखील वाचत आहे.
2. ऑनलाइन शिक्षण घेताना आपल्याला इतर कोणत्याही गोष्टींची गरज भासत नाही. जसे की, स्कूल बॅग, पेन, वही त्यामुळे आपला आपला आर्थिक खर्च वाचतो.
3. ऑनलाईन शिक्षण प्रणाली मध्ये आपला वेळ वाचला जातो. विदेशात जावून शिक्षण पूर्ण करणारी इच्छा असणारे विद्यार्थी पण आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने ते पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षकांचा पुरेपूर लाभ होत आहे.
4. तसेच या महाविद्यालयापासून दूर राहणारे विद्यार्थी किंवा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण आणि खूपच मदत झालेली आहे. त्या विद्यार्थ्यांच्या वेळेची बचत, पैशाची बचत आणि त्यांची शारीरिक ऊर्जेची बचत देखिला होत आहे.

5. जर ऑनलाईन वर्गाच्या वेळी विद्यार्थ्याला एखादा मुद्दा स्पष्टपणे समजला नसेल तर तो शिक्षकांना पुन्हा तो मुद्दा सांगण्यास सांगू शकतो. याशिवाय विद्यार्थ्याला कोणताही टॉपिक जर समजत नसेल तर तो रेकॉर्ड केलेल्या लेक्चर ला पुन्हा पाहू शकतो.
6. ऑनलाईन शिक्षणाद्वारेच विद्यार्थ्यांनी घरीच अभ्यास पूर्ण केला. घरातच शिक्षण मिळवून ती कोरोनाच्या धोक्यातून हि वाचली आणि शाळा व महाविद्यालयात जाण्याच्या त्रास व खर्च वाचला.

## ऑनलाईन शिक्षणाचे तोटे :-

ज्याप्रमाणे ऑनलाईन शिक्षणाचे फायदे आपण वर पाहिले आहे त्याप्रमाणे ऑनलाईन शिक्षणाच्या तोटे देखील आहेत ते पुढीलप्रमाणे-
1. ऑनलाइन शिक्षण घेण्यासाठी आपल्याला जलद इंटरनेट कनेक्टिव्हिटी, मोबाइल लॅपटॉप यासारख्या साधनाची आवश्यकता भासते. ती साधने खूपच खर्चिक आहेत व गरीब विद्यार्थ्यांना ते घेणे शक्य नाही.
2. मोबाईल, लॅपटॉप समोर कित्येक तास ऑनलाईन अभ्यास करताना विद्यार्थ्यांना डोळ्यावर ताण निर्माण होत आहे यातून डोळ्यांचे विकार यासारख्या समस्या समोर येत आहे.
3. ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्तपणा राहिला नाही.
4. तसेच विद्यार्थी अभ्यासाकडे योग्य लक्ष देतात का नाही हे शिक्षकांना बघणे शक्य नाही. त्यामुळे विद्यार्थी भे कित्येकदा ऑनलाइन तास चालू ठेवून खेळ खेळणे, जेवण करणे असे कृत्य करताना पाहायला दिसते.
5. ग्रामीण भागामध्ये ऑनलाईन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कित्येकदा नेटवर्क प्रॉब्लेम येतो. त्यामुळे व्यवस्थित आवाज न येणे, चित्र व्यवस्थित न दिसणे अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

## सारांश /निष्कर्ष:-

ऑनलाईन शिक्षणामुळे आज मूल घर बसल्या शिकू शकत आहेत, आज जगभरातील मुले ऑनलाइन शिक्षणाद्वारे सहजपणे अभ्यास करण्यास सक्षम आहेत. ऑनलाइन शिक्षण मिळविण्यासाठी चांगल्या आणि जलद इंटरनेट कनेक्टिव्हिटीची आवश्यकता असते.

## संदर्भ ग्रंथ:-

1.ओक, सुमन, शैक्षणिक तंत्रविज्ञान, पुणे, १९८४.
2.जगताप, ह. ना., प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान, पुणे, २००७.
3.पवार, यु. व्ही., अध्ययन अध्यापन व मूल्यमापनात नवोपक्रमांचा वापर इनसाईट, नाशिक, २०११.
4.पाटील, बी. एम.; शिखरे, व्ही. पी., शैक्षणिक तंत्रविज्ञान व महिती तंत्रविज्ञान, कोल्हापूर, २०११.
5.भोसले, र. अ.; डोणे, उ. म., शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, कोल्हापूर, २००९.